# मंत्रिमंडळ बैठका

## बैठक क्र. १०२-१०७

(विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीतील बैठका)

**दिनांक : २ मार्च ते २५ मार्च २०२२**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | निर्णयांची संख्या |
|---|---|---|---|
| **१०२** | २ मार्च २०२२ | सह्याद्री अथितीगृह (अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला) | ५ |
| **१०३** | ३ मार्च २०२२ | विधानभवन, मुंबई | |
| **१०४** | ४ मार्च २०२२ | विधानभवन, मुंबई | |
| **१०५** | १० मार्च २०२२ | विधानभवन, मुंबई | |
| **१०६** | ११ मार्च २०२२ | विधानभवन, मुंबई | |
| **१०७** | २३ मार्च २०२२ | विधानभवन, मुंबई | |

२ मार्च २०२२

गृह विभाग

**“पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग” नामकरणास मान्यता**

पोलीस महासंचालक कार्यालयाच्या पोलीस बिनतारी संदेश विभागाचे “पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग” असे नामकरण करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

बैठकीत या विभागातील मंजूर पदांची पुनर्रचना करुन सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात आली. यात सध्याची ३ हजार ९६२ मंजूर पदांची पुनर्रचना करण्यात येणार आहे. सहायक पोलीस उप निरीक्षक संवर्गातील ३२१ पदे निरसित करुन व विविध संवर्गाची नव्याने २२८ पदांची निर्मिती करण्यात येणार असून एकूण ३ हजार ८६९ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात आली. त्यानुसार विविध ३० संवर्गाचे ८ संवर्गामध्ये एकत्रिकरण करण्यात आले आहे.

-----०-----

२ मार्च २०२२

महसूल विभाग

**सारथीच्या विभागीय मुख्यालयासह उपकेंद्राला कोल्हापूरात जागा**

सारथी संस्थेस कोल्हापूर येथे विभागीय मुख्यालय, उपकेंद्र आणि मुलां- मुलींसाठीची स्वतंत्र वसतीगृहे याकरिता १ हेक्टर ६० आर जमीन उपलब्ध करुन देण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच सारथी संस्थेच्या उर्वरीत ७ विभागीय कार्यालयांकरिता अशी जमीन नियोजन विभागास उपलब्ध करुन देण्याकरिता महसूल मंत्री यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

सारथी संस्थेसाठी कोल्हापूर शहरातील १ हेक्टर ६० आर जमीन उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच उभारण्यात येणाऱ्या वसतीगृहाच्या बांधकाम व त्याच्या संचालनाचे काम सारथी संस्थेमार्फत करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे बैठकीत सारथी संस्थेच्या उर्वरित ७ विभागीय कार्यालये, वसतीगृहांकरीता व इतर प्रयोजनासाठी त्या त्या ठिकाणची विशिष्ठ परिस्थिती लक्षात घेवून किमान १ हेक्टर ६० आर जमीन अथवा आवश्यक क्षेत्र सारथी संस्थेकरीता नियोजन विभागास उपलब्ध करुन देण्याकरिता महसूल मंत्री यांना प्राधिकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

२ मार्च २०२२

वैद्यकीय शिक्षण विभाग

**परभणी येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय**

**१०० प्रवेश क्षमतेसह ४३० खाटांच्या रुग्णालयास मान्यता**

परभणी येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित रुग्णालय सुरु करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

या निर्णयानुसार मौजे ब्रम्हपूरी (ता. जि.परभणी) येथे १०० प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्न ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय सुरु करण्यात येणार आहे. नाशिक व उस्मानाबाद या दोन नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयानंतर हे राज्यातील पंचवीसावे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास आहे. या महाविद्यालय व रुग्णालयासाठी आवश्यक पदनिर्मिती आणि ही पदे भरण्यासही मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

महाविद्यालय व रुग्णालयाकरिता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांप्रमाणे परभणी येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, अस्थिव्यंग रुग्णालय व स्त्री रुग्णालय आवश्यक जागेसह तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय शिक्षण विभागास वापरास उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. याकरिता मौजे ब्रम्हपूरी (ता. जि. परभणी) येथील उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाची ५२ हेक्टर ०६ आर जमीन निःशुल्क हस्तांतरित करण्यात येणार आहे.

बैठकीत महाविद्यालय व रुग्णालयांसाठी आवश्यक तसेच अतिरिक्त बांधकाम करण्यास व त्यासाठीच्या अंदाजित ६८२ कोटी ७६ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन त्याप्रमाणे खर्चास मान्यता देण्यात आली.

-----०-----

२ मार्च २०२२

गृह विभाग

## मुंबईवरील २६/११ च्या हल्ल्यात शौर्य गाजविणाऱ्या पोलीस अधिकारी-कर्मचारी यांना सेवा विषयक लाभ

मुंबई शहरावर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेला दहशतवादी हल्ला परतवून लावण्यासाठी शौर्य गाजविलेल्या सेवेतील १५ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सेवाविषयक लाभ देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या कुटुंबीयांना यापूर्वीच विशेष मदत मंजूर करण्यात आली आहे. तसेच या हल्ल्यात शौर्य गाजविलेले अन्य अधिकारी आणि कर्मचारी यांना राष्ट्रपती पोलीस शौर्य पदक, पोलीस महासंचालकाचे सन्मानचिन्ह आणि पराक्रम पदक अशी विशेष बक्षिसे व रोख रक्कम स्वरुपात देऊन सन्मान करण्यात आला आहे. पण सेवेत असलेल्या अशा १५ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सेवाविषयक लाभ मंजूर करण्यात आला नव्हता. आजच्या बैठकीतील निर्णयानुसार या सर्व कर्मचाऱ्यांना लाभ मंजूर करण्यात आला आहे.

यानुसार शासकीय सेवेत असलेल्या किंवा तत्पुर्वी सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हल्ल्याच्या महिन्यापासून म्हणजेच नोव्हेंबर, २००८ पासून पुर्वीलक्षी प्रभावाने ते त्यावेळी कार्यरत असलेल्या पदाच्या नजिकची पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी, आणि त्यानुसार वेतननिश्चितीचा लाभ देण्यात येणार आहे. या वेतननिश्चितीचा लाभ संबधिताच्या सेवानिवृत्ती वेतनासाठीही लागू असणार आहे. बैठकीत यासाठी आवश्यक ६७ लाख ४५ हजार ०१६ एवढया अंदाजित खर्चासही मंजुरी देण्यात आली.

-----o-----

१० मार्च २०२२

महसूल विभाग

## कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९५६ मध्ये जमिनीच्या संदर्भात असलेल्या तरतूदीत सुधारणा

कातकरी, शेतमजूर आणि कारागीर यांच्या वस्त्यांची ठिकाणे व घरे आणि घराखालील जमिनी यासंबंधीचे अधिकार अभिलेख संबंधितांच्या नावे करण्याच्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९५६ मधील कलम १७ ब (२) अन्वये दि.३१.०५.२०२२ असा विनिर्दिष्ट दिनांक जाहिर करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

-----o-----